**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक** 07/03/2026

**आलोसे** - श्री. निखिल अशोक कवाडे ,उपविभागीय जलसंधारण अधिकारी ,वैजापूर जलसंधारण विभाग जिल्हा परिषद कार्यालय, छत्रपती संभाजीनगर (वर्ग 1) यांनी तक्रारदार यांचेकडुन 7,000/- लाच स्विकारल्याने आलोसे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या जाळ्यात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | छत्रपती संभाजीनगर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पोलीस ठाणे वैजापूर छत्रपती संभाजीनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आलोसे यांचे नाव व पत्ता | श्री. निखिल अशोक कवाडे वय 33 वर्ष व्यवसाय - उपविभागीय जलसंधारण अधिकारी ,वैजापूर जलसंधारण विभाग जिल्हा परिषद कार्यालय, छत्रपती संभाजीनगर (वर्ग 1) रा.श्रीपत ठोंबरे यांचे घरी,अयोध्या नगर, शिवूर रोड, वैजापूर जि. छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागणी रक्कम | 10,000/- (दहा हजार रुपये) |
| लाच स्विकृती रक्कम | 7,000/- (सात हजार रुपये फोन पे व्दारे) |
| सापळा अधिकारी<br>तपास अधिकारी | श्री.बाळासाहेब सदाशिव शिंदे, पोलीस उप अधीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर.<br>श्री. वाल्मिक कोरे, पोलिस निरीक्षक, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर. |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांची टूर्स अँड ट्रॅव्हल्स एजन्सी असून ते भाडेतत्वावर गाड्या जिल्हा परिषद छत्रपती संभाजीनगर यांना पुरवठा करतात. त्यानी उपविभागीय जलसंधारण अधिकारी वैजापूर यांना मासिक भाडेतत्वावर बोलेरो गाडी दिली होती. त्याचे प्रलंबित बिल तयार करून एम बी बुक, लॉग बुक व कॉंटीजेन्सी बिल यावर सही करून ते मंजुरीकरिता मुख्य कार्यालय येथे पाठविण्याकरिता आज रोजी तक्रारदार यांना 10,000/- रुपयाची मागणी केली |
| थोडक्यात माहिती | तक्रारदार यांचे तक्रारीचे अनुषंगाने दिनांक 07/03/2026 रोजी पंचासमक्ष लाच मागणी पडताळणी केली असता, यातील आरोपी निखिल कवाडे यांनी तक्रारदार यांना त्याचे भाडेतत्वावरील गाडीचे प्रलंबित बिल तयार करून एम बी बुक, लॉग बुक व कॉंटीजेन्सी बिल यावर सही करून ते मंजुरीकरिता मुख्य कार्यालय येथे पाठविण्याकरिता 10,000/- हजार रुपयांची लाच मागणी करून, तडजोडी अंती 7,000/- रुपये फोन पे वरती ऑनलाईन स्वीकारण्याचे पंचांसमक्ष मान्य केले.<br>निखिल कवाडे,उपविभागीय जलसंधारण अधिकारी वैजापूर जलसंधारण विभाग, जिल्हा परिषद छ. संभाजीनगर यांच्या लाच मागणी नंतर दिनांक 07/03/2026 रोजी शासकीय पंच समक्ष सापळा कारवाई दरम्यान अयोध्या नगर, शिवूर रोड वैजापूर येथील तक्रारदार यांच्या कडून 7,000/-रुपये लाच रक्कम पंच साक्षीदार यांच्या समक्ष फोन पे द्वारे ऑनलाईन स्विकारल्या नंतर पंचासमक्ष सापळा पथकाने ताब्यात घेतले.<br>आलोसे यांचे राहते घराची घरझडती घेण्याची प्रक्रीया सुरु आहे तसेच आलोसे यांच्या विरुध्द वैजापूर पोलीस स्टेशन छत्रपती संभाजी नगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर सापळा कारवाई ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांनी केली असुन पुढील तपास ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर घटक करणार आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्रीमती माधुरी केदार कांगणे, अपर पोलीस अधीक्षक श्री.शशिकांत सिंगारे, पोलीस उप अधीक्षक श्री राजीव तळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी श्री.बाळासाहेब सदाशिव शिंदे, पोलीस उप अधीक्षक, यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी श्री वाल्मिक कोरे, पोलिस निरीक्षक, पोशि. अनवेज शेख , प्रकाश डोंगरदिवे, चांगदेव बागुल ला. प्र. वि. घटक छत्रपती संभाजीनगर ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जुना बाजार, छत्रपती संभाजीनगर
ई- मेल :-1)spacbaurangabad@mahapolice.gov.in 2) dysp.acbcsn@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharashtra.net संपर्क क्रं. :- 0240-2344050, टोल फ्रि क्रं. 1064,
पोलीस अधीक्षक :- 90110 92777 अपर पोलीस अधीक्षक :- 9923102205
पोलीस उप अधीक्षक :- 9823498777 व्हॉट्सअप क्रमांक :- 7720891064

**( राजीव तळेकर )**
पोलीस उप अधिक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.